





# दैनिक आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

1,22,570 डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे पुण्यातील लोकप्रिय दैनिक





• वर्ष : ०३ • अंक : ११९ • पुणे • शनिवार, दि. १० जानेवारी २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313


## बदलापूरची इज्जत वेशीवर!

# भाजपचा निर्लज्ज निर्णय

### बाल लैंगिक अत्याचार प्रकरणातील सहआरोपीला नगरसेवकपद देत अनोखा पायंडा

### शहरात संतापाची लाट; नियुक्ती रद्द करण्याची जोरदार मागणी



**बदलापूरकरांचा थेट सवाल**

**"ज्या शाळेत मुली सुरक्षित नव्हत्या, त्या शाळेच्या चालकाला शहराचा कारभार पाहण्यासाठी बसवणे हा पीडित मुलींच्या कुटुंबीयांचा उघड अपमान आहे," अशी तीव्र भावना स्थानिक महिलांनी व्यक्त केली. विरोधी पक्षांनीही या मुद्द्यावरून आक्रमक भूमिका घेतली असून, ही नियुक्ती तात्काळ रद्द करण्याची मागणी लावून धरली आहे. 'बेटी बचाओ'चे नारे देणाऱ्या भाजपनेच बाल अत्याचार प्रकरणातील सहआरोपीला सत्तेच्या खुर्चीवर बसवणे म्हणजे दुटप्पीपणाचा कळस असल्याचे मत सर्वसामान्य बदलापूरकर व्यक्त करत आहेत. आता प्रश्न एकच सत्ता महत्त्वाची की संवेदनशीलता? याचे उत्तर भाजपला बदलापूरच्या जनतेला द्यावेच लागणार आहे.**

**बदलापूर (दै. आरंभ पर्व)**

संपूर्ण देशाला हादरवून सोडणाऱ्या बदलापूर बाल लैंगिक अत्याचार प्रकरणातील जखमा अजूनही ताज्याच असताना सत्ताधारी भारतीय जनता पार्टीने घेतलेल्या एका निर्णयामुळे बदलापूरची मान वेशीवर टांगली गेल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे. या गंभीर प्रकरणातील सहआरोपी आणि शाळेचा सचिव तुषार आपटे याची थेट स्वीकृत नगरसेवक म्हणून नियुक्ती केल्याने भाजपवर सर्वस्तरातून टीकेची झोड उठली आहे.

ऑगस्ट २०२४ मध्ये बदलापूरच्या एका नामांकित शाळेत दोन लहान मुलींवर लैंगिक अत्याचाराची धक्कादायक घटना घडली होती. या प्रकरणातील मुख्य आरोपी अक्षय शिंदेच्या एन्काऊंटरनंतरही प्रकरण संपले नाही. शाळेचे अध्यक्ष उदय कोतवाल आणि सचिव तुषार आपटे यांनी हा प्रकार दडपल्याचा ठपका ठेवत त्यांच्यावर POCSO कायद्यांतर्गत गुन्हे दाखल झाले. तब्बल ४० दिवस फरार राहिल्यानंतर अटक झालेला आपटे सध्या जामिनावर बाहेर आहे.

अशा गंभीर गुन्ह्यातील सहआरोपीला नगरपरिषदेचे पद देणे म्हणजे पीडितांच्या जखमांवर मीठ चोळण्यासारखे असल्याची संतप्त प्रतिक्रिया उमटत आहे.

शुक्रवारी पार पडलेल्या कुळगाव–बदलापूर नगरपरिषदेच्या पहिल्या सर्वसाधारण सभेत पाच स्वीकृत नगरसेवकांची नावे जाहीर झाली. त्यात तुषार आपटेचे नाव येताच सभागृहात आणि शहरात एकच खळबळ उडाली. राजकीय वर्तुळात सुरू असलेल्या चर्चेनुसार, नुकत्याच झालेल्या निवडणुकांमध्ये भाजप उमेदवारांना निवडून आणण्यासाठी आपटे यांनी मोठ्या प्रमाणावर रसद आणि आर्थिक मदत केल्याचे सांगितले जाते. याच 'मदती'ची परतफेड म्हणून हे पद बहाल केल्याचा आरोप होत असून, भाजपच्या नैतिकतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## 'जाहीरनामे नव्हे, विकास आराखडा द्या'

### नागरिकांचे उमेदवारांना आवाहन

- **कोल्हेवाडी रस्त्यावर लागला मोठा बॅनर**




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कोल्हेवाडी रस्ता येथे नागरिकांच्या वतीने एक मोठा आशयपूर्ण बॅनर लावण्यात आला असून, त्यातून सर्व पक्षांतील उमेदवारांना थेट सवाल करण्यात आला आहे. उमेदवारांचे जाहीरनामे म्हणजे केवळ चुनावी जुमले ठरत असल्याची भावना व्यक्त करत, आता नागरिकांच्या प्रत्यक्ष मागण्यांना प्राधान्य द्यावे, असा ठाम संदेश या बॅनरद्वारे देण्यात आला आहे.

'माझा प्रभाग – विकास नियोजन मंच'च्या माध्यमातून नागरिकांनी पुढाकार घेत हा उपक्रम राबवला आहे. ग्रामपंचायत, महानगरपालिका, राज्य सरकार व केंद्र सरकार अशी लोकशाही व्यवस्था गेली जवळपास ८० वर्षे अस्तित्वात असतानाही आजही निवडणुका नळ म्हणजे पाणी, गटार आणि रस्ता या अत्यंत मूलभूत प्रश्नांवरच लढवल्या जात आहेत, ही बाब बॅनरमधून ठळकपणे मांडण्यात आली आहे.

"आम्हाला केवळ आश्वासनांची यादी नको, तर प्रभागनिहाय ठोस विकास आराखडा, स्पष्ट वेळापत्रक आणि काम पूर्ण न झाल्यास जबाबदारी निश्चित करणारी व्यवस्था हवी," अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, दर्जेदार रस्ते, स्वच्छता व नागरी सुविधांचा समावेश असलेले नियोजन उमेदवारांनी जाहीर करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

कोल्हेवाडी रस्त्यावर लावलेल्या या बॅनरची परिसरात चांगलीच चर्चा सुरू असून, हा उपक्रम म्हणजे राजकारणाला केवळ घोषणांच्या चौकटीत न अडकवता विकासकेंद्री बनवण्याचा नागरिकांचा प्रयत्न म्हणून पाहिला जात आहे.

आता उमेदवार या नागरिकांच्या आवाहनाला कितपत प्रतिसाद देतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे

## ठळक बातम्या

### पोलिस उपनिरीक्षकाने संपवला जीव

**पुणे (आरंभ पर्व) : विषारी औषध प्राशन करून एका पोलिस उपनिरीक्षकाने आपटे रस्त्यावरील एव्हरेस्ट हॉटेलमध्ये आत्महत्या केली. बुधवारी (दि. 7) दुपारी एक वाजताच्या सुमारास हा प्रकार उघडकीस आला. सुरज सुभाष मराठे (वय 30, रा. देहूरोड, आळंदी) असे आत्महत्या केलेल्या पोलिस उपनिरीक्षकाचे नाव आहे. आत्महत्या करण्यापूर्वी सुरज यांनी सुसाईड नोट लिहिली असून, त्यामध्ये कोणाला जबाबदार धरू नये. माझ्या वैयक्तिक ऑपरेशनच्या कारणातून आत्महत्या करीत आहे, असे नमूद केले आहे. सुरज हा गुडघ्याच्या विकाराने ग्रास्त होता, असे त्याच्या कुटुंबीयांनी सांगितले, अशी माहिती डेक्कन पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षक गिरीशा निंबाळकर यांनी दिली. याबाबत डेक्कन पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.**

## पुण्यात व्हॉट्सअ‍ॅप स्टेटसवरून तरुणाचा निर्घृण खून

- **खराडीतील घटनेने खळबळ; बीअरच्या बाटलीने व दगडाने मारहाण, आरोपी अटकेत**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पूर्ववैमनस्य आणि व्हॉट्सअ‍ॅपवरील स्टेट्सच्या कारणातून झालेल्या वादात एका तरुणाच्या डोक्यात दगड, बीअरच्या बाटलीने मारहाण करून खून करण्यात आल्याची घटना घडली आहे. आकाश ऊर्फ आक्या किसन तराळे (वय 25, रा. खांदवेनगर, लोहगाव) असे खून झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी, खराडी पोलिसांनी विजय उर्फ जलवा संजय वाघमारे (वय 23, रा. राजाराम पाटीलनगर खराडी, मूळ. पालम, जि. परभणी) याला अटक केली आहे. याबाबत आकाश याचा मित्र अमित चंद्रकांत भोसले (वय 35, रा. उबाळेनगर, वाघोली, मूळ माणगाव, मुळशी) याने फिर्याद दिली आहे. ही घटना गुरुवारी (दि. 8) रात्री सव्वानऊच्या सुमारास स्वास्थ्य क्लिनिक बिल्डिंगसमोर, स्वीट इंडिया चौकाजवळ, खराडी येथे घडली आहे. दरम्यान, यावेळी आरोपीने फिर्यादीला देखील हाताने व लाथाबुक्यांनी मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी विजय ऊर्फ जलवा आणि खून झालेला तरुण आकाश उर्फ आक्या या दोघांत व्हॉटस्अप स्टेट्स ठेवल्याच्या कारणातून वाद झाला होता. गुरुवारी रात्री सव्वानऊच्या सुमारास फिर्यादी अमित आणि आकाश खराडी येथील इंडिया चौकाजवळील परिसरात गप्पा मारत बसले होते. त्यावेळी आरोपी विजय तेथे आला. त्याने आकाश याला तू सूरज साबळेचे स्टेटस् ठेवतो, सूरज साबळेचा मी बदला घेणार, मी तुझेसुद्धा काम तमाम करतो, असे म्हणून फिर्यादी व आकाश याला शिवीगाळ करून मारहाण केली. त्यानंतर आकाश याच्या डोक्यात बीअरच्या बाटलीने मारहाण करून मोठा दगड डोक्यात घातला. त्यामध्ये गंभीर जखमी झाल्याने आकाशचा मृत्यू झाला.

## पुणे महापालिका निवडणूक; चार उमेदवारांना मतदान अनिवार्य!

### चारपेक्षा कमी मते दिल्यास मतदान अपूर्ण; ईव्हीएमवर ३० सेकंदांत प्रक्रिया पूर्ण करण्याचे प्रशासनाचे आवाहन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महापालिका निवडणुकीत चारसदस्यीय प्रभागरचना असल्याने मतदारांनी चारही उमेदवारांना मतदान करणे अनिवार्य असल्याची महत्त्वाची माहिती महापालिकेच्या निवडणूक विभागाकडून देण्यात आली आहे. मतदाराने चारपैकी एक, दोन किंवा तीनच उमेदवारांना मत दिल्यास मतदान प्रक्रिया पूर्ण मानली जाणार नाही, असा स्पष्ट इशारा अधिकाऱ्यांनी दिला आहे. महापालिका अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, मतदानाच्या वेळी मतदाराने चारपैकी काही उमेदवारांना मते दिल्यास ईव्हीएमवरील मतदान प्रक्रिया अपूर्ण राहते. अशा परिस्थितीत केंद्राध्यक्ष संबंधित मतदाराची दिलेली मते पूर्णपणे गोपनीय राहतील, याची दक्षता घेत मतदान केंद्राबाहेरील सर्व पक्षांच्या बूथ प्रमुखांना बोलावण्यात येईल. त्यानंतर ज्या उमेदवारांना मत देण्यात आलेले नसेल, त्या जागांवर नोटा बटन दाबून मतदान प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल. यामुळे मतदाराने दिलेल्या मतांवर कोणताही परिणाम होत नसला, तरी अपूर्ण मतदान टाळण्यासाठी मतदारांनी चारही



उमेदवारांना मत देणे अत्यावश्यक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. प्रशासनाच्या म्हणण्यानुसार, अनेक मतदारांमध्ये चार सदस्यीय प्रभाग पद्धतीबाबत संभम आहे. 'चारपेक्षा कमी मते दिल्यास उर्वरित मते आपोआप नोटाला जातील' किंवा 'तीनच मते दिली तरी मतदान पूर्ण होईल' अशा अफवांमुळे गैरसमज पसरत आहेत. मात्र, प्रत्यक्षात मतदान प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी चारही मते नोंदवणे गरजेचे आहे. मतदान केंद्रांवर गोंधळ होऊ नये, मतदान प्रक्रियेला विलंब लागू नये, यासाठी प्रत्येक मतदाराने ईव्हीएमवर चार वेळा बटन दाबून मतदान पूर्ण करावे, असे आवाहन निवडणूक अधिकाऱ्यांनी केले आहे. महापालिका निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी आणि प्रक्रिया सुलभ ठेवण्यासाठी ही बाब अत्यंत महत्त्वाची असून, नागरिकांनी मतदानापूर्वी नियमांची माहिती करून घेणे गरजेचे असल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे. लोकसभा विधानसभेत एका उमेदवाराला मतदान करायचे असल्याने काही सेकंदात उमेदवारासमोरील ईव्हीएमचे बटन दाबून मतदान प्रक्रिया पूर्ण होत होती. महापालिका निवडणुकीत अ, ब, क आणि ड या क्रमानुसार चौघांना मतदान करायचे आहे.

**एका ईव्हीएमवर १४ नावे**

**एका ईव्हीएमवर 14 नावे बसतात जर समजा अ जागेचे 7 उमेदवार असल्यास त्यानंतर 8 व्या जागेवर नोटाचे बटन असणार तर 9 व्या क्रमांकावर ब जागेचे उमेदवार असा मथळा असणार त्यानंतर ब जागेसाठी 4 उमेदवार असल्यास 14 व्या क्रमांकावर नोटाचे बटन असणार. त्यापुढील मशीनवर देखील याच पद्धतीने क आणि ड चे उमेदवार असेल. उमेदवारांची संख्या जास्त असल्यास जास्त मशीन लागतील. काही प्रभागात ही परिस्थिती असल्याची माहिती प्रशासनाने दिली.**

**महापालिकेसाठी निवडणुकीत 4 उमेदवारांना मतदान करावे. जर एखाद्या व्यक्तीने चार ऐवजी कमी लोकांना मतदान केल्यास मतदान प्रक्रिया पूर्ण होणार नाही. अशा स्थितीत केंद्राध्यक्ष संबंधित मतदाराची दिलेली मते पूर्णपणे गोपनीय राहतील, याची दक्षता घेत मतदान केंद्राबाहेरील सर्व पक्षांच्या बूथ प्रमुखांना बोलावण्यात येईल. त्यानंतर ज्या उमेदवारांना मत देण्यात आलेले नसेल, त्या जागांवर नोटा बटन दाबून मतदान प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल**

**- ओमप्रकाश दिवटे, अतिरिक्त आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी**

## बहिणींना मिळणार संक्रांतीपूर्वी तीन हजार रुपये

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

लाडक्या बहिणींना एकूण तीन हप्ते देय होते. त्यापैकी एका हप्त्याची रक्कम डिसेंबरमध्ये देण्यात आली. आता उर्वरित दोन हप्त्यांचे तीन हजार रुपये येत्या मकर संक्रांतीपूर्वी त्यांच्या बँक खात्यात जमा केले जाणार आहेत. राज्याचे जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांनी सोशल मीडियावरून ही माहिती दिली. बहिणींच्या खात्यात डिसेंबर व जानेवारी महिन्याचे 3 हजार जमा होणार. विधानसभेच्या निवडणुकीच्या आधीपासून मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतून राज्यातील पात्र महिलांना दरमहा दीड हजार रुपये दिले जातात. डीबीटीअंतर्गत ही रक्कम महिलांच्या खात्यात थेट जमा होते. सध्या या योजनेची ई-केवायसी प्रक्रिया होती. त्यामुळे दिवाळीनंतर या योजनेचे हप्ते महिलांच्या खात्यात आले नव्हते. नोव्हेंबर आणि डिसेंबर या दोन



- **जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांची सोशल मीडियावरून माहिती**

महिन्यांचे पैसे आले नव्हते. पण, 31 डिसेंबर 2025 आणि 1 व 2 जानेवारी 2026 या काळात काही महिलांच्या खात्यात नोव्हेंबर महिन्याचे दीड हजार रुपये जमा झाले. त्यामुळे लाडक्या बहिणींना आता डिसेंबर आणि जानेवारी अशा दोन हप्त्यांची प्रतीक्षा आहे. पण, मंत्री महाजन यांच्या पोस्टनुसार आता हे दोन महिन्यांचे तीन हजार रुपये 14 जानेवारीपूर्वी मिळणार आहेत.

## वॉर्ड क्र. ३४ मधील पाणी, वाहतूक आणि आरोग्य समस्या सोडवण्यास शिवसेना कटिबद्ध

**पुणे, प्रतिनिधी**

पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी प्रचाराचा जोर वाढला असून प्रभाग क्रमांक ३४ नऱ्हे-वडगाव बु.-धायरीमध्ये शिवसेनेच्या उमेदवारांनी प्रचारात आघाडी घेतल्याचे दिसते. या प्रभागात नव्याने महापालिकेत समाविष्ट गावांचा समावेश असून नऱ्हे-वडगाव बु.-धायरीमध्ये पाणी, वाहतूक आणि आरोग्य समस्या सोडवण्यास शिवसेना कटिबद्ध असल्याची ग्वाही शिवसेना उमेदवारांनी मतदारांना दिली.

प्रभाग क्रमांक ३४ नऱ्हे-वडगाव बु. - धायरीमध्ये शिवसेनेच्या वतीने गिरमे निलेश दशरथ, गिरमे राधिका दशरथ, सुप्रिया ईश्वर भूमकर आणि युवा




पत्रकार तांबे विठ्ठल ज्ञानेश्वर निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

समाविष्ट गावे पहिल्यांदाच महापालिका निवडणुकीला सामोरे जात आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नेहमी सामान्य लोकांच्या विकासाला प्राधान्य दिले आहे. त्यामुळे शिवसेनेच्या उमेदवारांना या गावांच्या विकासासाठी महापालिकेत पाठवणे गरजेचे आहे. नगर विकास खात्यासह महत्त्वाची खाती शिवसेनेकडे असल्याने शहराच्या विकासाला गती मिळेल.

नऱ्हे गावातील पाण्याच्या पाईपलाइनसाठी शिवसेना नेत्या डॉ. निलम गोऱ्हे यांनी निधी दिला होता, त्यामुळे या भागाला पिण्याचे पाणी उपलब्ध झाले. आता फिल्टरची मागणी आहे, ती पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करू. समाविष्ट गावांच्या करमाफीचा मुद्दा मांडला आहे, मात्र प्रशासकामुळे दुर्लक्ष झाले आहे. नवे पोलीस स्टेशन शिनसेना नेते, गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्यामुळे सुरू झाले आहे. दिवसेंदिवस पुण्याला पाण्याची समस्या भीषण होत चालली आहे, त्यामुळे शेतीसाठी आणि पिण्याच्या पाण्यासाठी स्वतंत्र धरणे बांधणे गरजेचे आहे. ही मागणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे करणार असल्याचे नुकतेच डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले आहे.

दरम्यान, या परिसरात लायगुडे दवाखाना वगळता महापालिकेच्या आरोग्य सुविधा नाहीत. यामुळे या प्रभागात महापालिकेच्या उत्तम आरोदय सेवा देण्यात येतील, तसेच वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी अतिक्रमाणे हटवून रस्ते रुंदीकरणास प्राधान्य देणार असे शिवसेनेच्या उमेदवारांनी सांगितले. यामुळे या परिसराचा विकास शिवसेनाच करू शकेल असा विश्वास नीलेश गिरमे, राधिका गिरमे, सुप्रिया भूमकर आणि विठ्ठल तांबे यांनी मतदारांना दिला आहे.



# मनसेला धक्का : विजय मते यांचा भाजपमध्ये प्रवेश

## धायरी-शिवणे दक्षिण मंडलाध्यक्षपदी नियुक्ती



**पुणे (दै. आरंभ पर्व)**
खडकवासला मतदारसंघातील राजकारणात महत्त्वाची घडामोड घडली असून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) विश्वासू नेते, अध्यक्ष विजय मते यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे. प्रवेशानंतर त्यांची खडकवासला मतदारसंघ – धायरी शिवणे दक्षिण मंडल अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली. या नियुक्तीमुळे खडकवासला मतदारसंघातील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

पक्षाने दाखवलेल्या विश्वासाबद्दल आणि दिलेल्या जबाबदारीबद्दल विजय मते यांनी मनःपूर्वक आभार व्यक्त केले. "आजपर्यंत केलेल्या सामाजिक व राजकीय कामांचा पक्षाने गौरव केला आहे. भाजपची संघटना अधिक मजबूत करण्यासाठी आणि तळागाळातील कार्यकर्त्यांना न्याय देण्यासाठी मी रात्रंदिवस काम करेन," असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

मंडलाध्यक्षपदी नियुक्तीनंतर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, खडकवासला मतदारसंघाचे आमदार भिमराव आण्णा तापकीर तसेच पुणे शहर भाजप अध्यक्ष धीरज घाटे यांच्या वतीने विजय मते यांचा सत्कार करण्यात आला. दरम्यान, विजय मते यांच्या भाजप प्रवेशामुळे मनसेला मोठा धक्का मानला जात आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली काम करत असताना खडकवासला मतदारसंघातील अनेक पदाधिकारी व निवडणूक लढवण्यास इच्छुक कार्यकर्त्यांना योग्य न्याय मिळू शकला नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

या परिस्थितीमुळे व्यथित होऊन आणि कार्यकर्त्यांचे भवितव्य लक्षात घेऊन भाजपमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

"माझा निर्णय कोणत्याही वैयक्तिक स्वार्थासाठी नाही. संघटनात्मक काम करताना कार्यकर्त्यांना संधी, न्याय आणि दिशा मिळणे आवश्यक असते. भाजपमध्ये मला ते शक्य होईल, असा विश्वास आहे," असे विजय मते यांनी सांगितले.

या घडामोडीमुळे खडकवासला मतदारसंघात भाजपची संघटनात्मक ताकद वाढल्याचे मानले जात असून आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या प्रवेशाकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.


## थोडक्यात पण महत्वाचे



### "मी लढणारा कार्यकर्ता आहे; त्यामुळे माझा विजय निश्चित" – संदीप मते

**पुणे (आरंभ पर्व) : आगामी पुणे महानगरपालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू असताना प्रभाग क्रमांक ३३ मधून उमेदवार संदीप मते यांनी आपली आक्रमक भूमिका स्पष्ट केली आहे. "लहानपणापासून संघर्ष करत इथपर्यंत आलो आहे. विकासात्मक दृष्टिकोन ठेवून वाटचाल करताना अनेक अडचणी आल्या, मात्र कधीही डगमगलो नाही. त्यामुळे निवडणूक कितीही अटीतटीची वाटली तरी माझा विजय निश्चित आहे," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माध्यमांशी संवाद साधताना ते म्हणाले की, जनतेसाठी केलेली कामे आणि नागरिकांशी असलेली तळमळ हीच आपली खरी ताकद आहे. "कुरघोडीचे राजकारण होत असले तरी जनतेचे समर्थन आमच्या पाठीशी आहे. त्यामुळे आम्ही सर्वजण निश्चितपणे विजयी होऊ," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. पक्षप्रवेशाबाबत सुरू असलेल्या चर्चांवरही त्यांनी स्पष्ट भूमिका मांडली. "कधी कधी परिस्थितीनुसार निर्णय घ्यावे लागतात. हा निर्णय कार्यकर्त्यांच्या हिताचा आहे. पक्ष सोडला म्हणून बदनामी करणे चुकीचे आहे. आजही माझ्या हातात शिवबंधन कायम आहे आणि हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांनीच माझी वाटचाल सुरू राहील," असे सांगत त्यांनी सर्व चर्चांना पूर्णविराम दिला. प्रभाग क्रमांक ३३ मध्ये फिरताना जनतेकडून मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद हा विजयाची नांदी असल्याचे त्यांनी नमूद केले.**

### प्रभाग क्र. २८ : नाद घुमणार, कमळ फुलणार;मुरलीधर मोहोळ



**पुणे (आरंभ पर्व) : पुणे महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक २८ (जनता वसाहत-हिंगणे खुर्द) येथे भारतीय जनता पार्टी – आरपीआय (A) यांच्या वतीने अधिकृत उमेदवारांच्या प्रचारासाठी भव्य आणि उत्साहवर्धक बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीमुळे संपूर्ण परिसरात भाजपाचा जोश, उत्साह आणि विजयाचा आत्मविश्वास स्पष्टपणे जाणवत होता. या प्रचार रॅलीसाठी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर अण्णा मोहोळ तसेच राज्यमंत्री माधुरीताई मिसाळ यांची प्रमुख उपस्थिती लाभली. भाजपाचे झेंडे, जोरदार घोषणा आणि कार्यकर्त्यांचा प्रचंड उत्साह यामुळे जनता वसाहत ते हिंगणे खुर्द परिसर अक्षरशः भाजपमय झाला होता. शेकडो दुचाकीस्वारांच्या सहभागामुळे ही रॅली लक्षवेधी ठरली.यावेळी प्रभागातील अधिकृत उमेदवार वृषाली आनंद रिठे, मनिषा संतोष बोडके, विनया प्रसाद बहुलीकर आणि माजी उपमहापौर ॲड. प्रसन्नदादा जगताप यांच्या प्रचाराला मोठे बळ मिळाले.**

# सेमी कंडक्टर उत्पादन क्षेत्रात आघाडी घेण्याची महाराष्ट्राची क्षमता

## व्हीएलएसआय सोसायटीचे अध्यक्ष डॉ. सत्य गुप्ता यांचे प्रतिपादन




**पुणे (दै. आरंभ पर्व)**
संगणकापासून कृत्रिम बुद्धिमत्तेपर्यंत सर्व तंत्रज्ञानांमध्ये अनिवार्य असलेल्या सेमीकंडक्टर उत्पादनामध्ये देशात आघाडी घेण्याची क्षमता महाराष्ट्राकडे असून त्यादृष्टीने सर्व पातळ्यांवर तयारी सुरू असल्याची माहिती व्हेरी लार्ज स्किल इंटिग्रेटेड सोसायटीचे अध्यक्ष डॉ. सत्या गुप्ता यांनी आज दिली.

सेमीकण्डक्टर उत्पादन क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी कार्य करणाऱ्या व्हीएलएसआय सोसायटीची '३९ वी व्हीएलएसआय डिझाइन आंतरराष्ट्रीय परिषद २०२६' आणि '२५ वी आंतरराष्ट्रीय एम्बेडेड सिस्टम्स परिषद' पुण्यात भरवण्यात आली आहे. या परिषदेला देशभरातून अडीच हजाराहून अधिक प्रतिनिधी उपस्थित असून तब्बल साडेपाचशे विद्यार्थी यामध्ये सहभागी झाले आहेत. परिषदेच्या उद्घाटन सत्रानंतर डॉ. गुप्ता यांच्यासह सोसायटीचे पदाधिकारी शैलेश परब, रणजित येवले आणि संजय घोरपडे यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

सध्याच्या काळात सर्व क्षेत्रात उपयोगात आणल्या जाणाऱ्या सर्व प्रकारच्या तंत्रज्ञानामध्ये सेमीकंडक्टर हा घटक अनिवार्य आहे. महाराष्ट्रात सेमी कंडक्टर उत्पादन क्षेत्रासाठी कुशल मनुष्यबळ, पायाभूत सुविधा व अन्य सर्व आवश्यक घटक उपलब्ध आहेत. या क्षेत्राला गती देण्यासाठी उद्योग, शिक्षण संस्था आणि शासन यांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक असून त्या दृष्टीने सोसायटीने पुढाकार घेतल्याचे गुप्ता यांनी सांगितले.

केंद्र सरकारबरोबरच आसाम, गुजरात, मध्य प्रदेश या राज्यांचे सेमीकंडक्टर उत्पादन क्षेत्राशी संबंधित धोरण निश्चित झाले आहे. महाराष्ट्रात हे धोरण निश्चित करण्याचे काम सुरू असून सरकारकडून याबाबत अनुकूल प्रतिसाद लाभत आहे. महाराष्ट्रात या क्षेत्रासाठी सर्वाधिक अनुकूलता असल्याचे गुप्ता यांनी नमूद केले. सेमी कंडक्टर उत्पादनक्षेत्रात आयटीआय प्रशिक्षित तंत्रज्ञापासून पदविका आणि पदवीधारक अभियंत्यांपर्यंत सर्वांना रोजगाराच्या संधी आहेत.

सेमी कंडक्टर डिझाईन आणि प्रत्यक्ष उत्पादन यासाठी सध्या अनेक शिक्षण संस्थांमधून प्रशिक्षण दिले जात आहे. मात्र, अद्याप या नव्याने उदयाला येत असलेल्या क्षेत्राबाबत विद्यार्थी आणि पालक यांच्यामध्ये पुरेशा प्रमाणात माहिती झालेली नाही. या क्षेत्रात सॉफ्टवेअर क्षेत्रापेक्षाही अधिक आकर्षक संधी उपलब्ध असल्याबद्दलची जाणीव शालेय स्तरापासूनच विद्यार्थी आणि पालकांना करून देणे आवश्यक असून त्यासाठी विविध शिक्षण संस्थांच्या सहकार्याने व्हीएलएसआय सोसायटी प्रयत्नशील असल्याचेही गुप्ता यांनी सांगितले.

**सेमी कंडक्टर उत्पादन क्षेत्रात विद्यार्थी घडवण्यासाठी सोसायटीने प्राधान्य दिले असून आगामी पाच वर्षात 50 हजार प्रशिक्षित मनुष्यबळ घडवण्याचे संस्थेचे उद्दिष्ट आहे. तसेच विद्यार्थ्यांना स्वतः सेमीकंडक्टर बनविण्याचे प्रात्यक्षिक प्रशिक्षण देण्यासाठी शिक्षण संस्थांना संस्थेच्या वतीने अनुदानही देण्यात येणार आहे, असेही गुप्ता यांनी सांगितले. दरम्यान, या परिषदेत विविध कंपन्या, संस्था सहभागी झाल्या असून अनेक परिसंवाद यामध्ये होणार आहेत, ही परिषद 7 जानेवारी पर्यंत चालणार आहे.**

# सुरेश कलमाडी यांना श्रद्धांजली



**पुणे (दै. आरंभ पर्व)**
अद्वैत क्रीडा केंद्र, पुणे यांच्या वतीने पुण्याचे माजी खासदार व केंद्रीय मंत्री स्वर्गीय सुरेशभाई कलमाडी यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी नवी पेठ येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात राजकीय, सामाजिक व क्रीडा क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. या श्रद्धांजली कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, पुणे शहर प्रभारी अध्यक्ष श्रीकांत पाटील व सचिन लांडगे हे प्रमुख मान्यवर उपस्थित होते. तसेच राजाभाऊ पाथरकर, नितीन शिंदे, संजय कांबळे, धनंजय मदने, अन्वर शेख, शेखर पवार, कुमार कंधारे, दिलीप लोळगे, शाम धावरे, सुनील लोंढे, काका काळे, सूर्यकांत येनपुरे, उद्धव पवार, स्वातीताई पोकळे, शांताराम बनसोडे, विजय भिकुले, गणेश सपकाळ आदी मान्यवरांनीही उपस्थित राहून श्रद्धांजली अर्पण केली.

# कोटक ऑल्ट्सने कॅटलिस्ट अवॉर्ड्सची केली सुरुवात

## २५ लाख रु. च्या पुरस्काराने भारतातील सर्वोत्तम फायनॅनष्यल व्होडकास्टला सन्मानित करणार

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**
कोटक ऑल्टरनेट ॲसेट मॅनेजर्स लिमिटेड ("कोटक ऑल्ट्स") ने आज कोटक ऑल्टस कॅटलिस्ट अवॉर्ड्सची सुरुवात केल्याचे घोषित केले. हा या प्रकारचा पहिला प्लॅटफॉर्म आहे, जो 25 लाख रु. चे बक्षीस देऊन देशातील सर्वोत्तम व्होडकास्टचा सन्मान करेल. सर्वोत्तम व्होडकास्टला पुरस्कृत करण्यामागील उद्देश अस्सल फायनॅनष्यल कंटेंटसाठी एक मापदंड तयार करण्याचा तसेच लक्षावधी तरुण आणि नवशिक्या गुंतवणूकदारांमध्ये आत्मविश्वास निर्माण करून त्यांना सक्षम बनवणाऱ्या क्रिएटर्सचा सन्मान करण्याचा आहे.

kotak
Alternate Asset Managers

महत्त्वाकांक्षी अर्जदार 1 जानेवारी 2025 ते 31 डिसेंबर 2025 दरम्यान प्रदर्शित झालेला आणि यूट्यूबवर सार्वजनिकरित्या उपलब्ध असलेला आपला एखादा व्होडकास्ट 31 जानेवारी 2026 पर्यंत katalyst.kotakalternateasset.com मार्फत स्पर्धेसाठी सादर करू शकतात. अर्ज सादर झाल्यानंतरच्या टप्प्यात या क्षेत्रातील मान्यवर परीक्षकांची एक पॅनल कंटेंटची गुणवत्ता, अस्सलता आणि प्रेक्षकांचा सहभाग यांच्या आधारे सर्व प्राप्त एंट्रीजचे मूल्यमापन करेल.

कोटक ऑल्टसचे मॅनिजिंग डायरेक्टर श्रीनी श्रीनिवासन म्हणाले, "भारतात आत्ता आर्थिक सहभागाची सर्वात मोठी लाट बघायला मिळते आहे. तुकड्या-तुकड्यांत मिळणारा सल्ला आणि प्रचलित शॉर्टकट्सने गजबजलेल्या डिजिटल विश्वात लक्षावधी नवीन गुंतवणूकदार स्पष्ट माहितीच्या शोधात आहेत.

अशावेळी, पॉडकास्ट आणि व्होडकास्ट आर्थिक साक्षरता प्रदान करण्याचे दमदार माध्यम म्हणून पुढे आले आहेत.

परंतु, त्यांची गुणवत्ता आणि विश्वसनीयता कमी-जास्त असल्याचे दिसून येते. याचा विचार करून, कॅटलिस्ट अशा एका क्रिएटरवर प्रकाशझोत टाकणार आहे, जो गुंतागुंत सोपी करून सांगतो, विश्वास निर्माण करतो आणि आर्थिक शिक्षण आकर्षक आणि व्यवहार्य बनवतो."

# जेव्हा रोमँटिक ट्रिप धोकादायक वळणावर जाते?




**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**
भारतातील प्रमुख डिजिटल एंटरटेनमेंट प्लॅटफॉर्म्सपैकी एक असलेल्या, हंगामा ओटीटीने 8 जानेवारी 2026 रोजी आपली नवीन ओरिजिनल सिरीज प्रयागराज की लव्ह स्टोरी लॉन्च केली. ही सिरीज प्रयागराजच्या सुंदर रस्त्यांवर, ऐतिहासिक घाटांवर आणि खास आकर्षक वातावरणात सेट केली आहे. सुरुवातीला रोमँटिक वाटणारी ही ट्रिप अचानक रोमांचक आणि धोकादायक सर्पायव्हल स्टोरीमध्ये बदलते. गौरव शर्मा, अंबिका वाणी, पवित्रा पुनिया आणि मनीष वाधवा यांसारख्या प्रतिभावान कलाकारांसह, हा शो रोमँस आणि सस्पेन्सचे मिश्रण आहे, जिथे एक तरुण जोडपे अचानक अशा शहरात अडकतात जे त्यांना परके वाटू लागते.

कथेत मुख्य भूमिकेत अंशुल सिंग आणि सोनिया शुक्ला आहेत, ज्यांची रोमँटिक सुट्टी अचानक धोकादायक वळण घेते, जेव्हा ते नकळतपणे रक्षक बनलेल्या निर्दयी गँगच्या जाळ्यात अडकतात. जे सुरुवातीला विश्वासाने भरलेले होते, ते लवकरच फसवणुकीत बदलते, आणि जोडप्याला दाट जंगलातून, अरुंद रस्त्यांमधून आणि गर्दीच्या बाजारातून पळावे लागते, जेणेकरून ते त्यांच्या मागे असलेल्या लोकांपेक्षा एक पाऊल पुढे राहू शकतील. भीती जवळ येते आणि प्रत्येक कोपऱ्यावर धोका उभा असतो, त्यामुळे त्यांचे नाते अशा दबावाखाली येते जिथे चुकीसाठी जागा नसते.

अंशुल सिंगची भूमिका साकारणाऱ्या गौरव शर्मा यांनी सांगितले, "अंशुल एक संवेदनशील आणि समजूतदार मुलगा आहे, पण सोशल मीडियाचा त्यावर मोठा प्रभाव आहे. जेव्हा परिस्थिती हाताबाहेर जाते, तेव्हा त्याचे आतले विचार आणि भावना काम करतात. मला सर्वात जास्त आवडले ते म्हणजे आरामदायक स्थितीतून संकटाच्या स्थितीत जाण्याचा हा बदल दाखवणे. प्रयागराजमधील प्रत्यक्ष ठिकाणी शूटिंग केल्याने प्रत्येक सीन अधिक खरा आणि जवळचा वाटला. प्रेक्षकांना त्या गोंधळाचा आणि भीतीचा अनुभव मिळतो."

सोनिया शुक्लाची भूमिका साकारणाऱ्या अंबिका वाणी म्हणाल्या, "हा माझा पहिला प्रोजेक्ट होता, आणि मी यापेक्षा चांगली सुरुवात होईल अशी कल्पनाही करू शकत नाही. सोनिया सुरुवातीला प्रेमात असलेली व्यक्ती आहे, आणि हळूहळू ती तिच्या आयुष्याच्या लढाईसाठी उभी राहते. हा बदल भावनिकदृष्ट्या खूप ताकदवान होता. मला सर्वात जास्त प्रभावित केले ते तिचा धैर्यशीलपणा. सर्व काही गमावूनही ती स्वतःवर किंवा प्रेमावर विश्वास ठेवते."

# अखिल वारकरी संघाचा पदग्रहण व भव्य किर्तन सोहळा

**खानापूर (दै. आरंभ पर्व)**
अखिल वारकरी संघ महाराष्ट्र राज्य, पुणे जिल्हा व हवेली तालुका यांच्या संयुक्त विद्यमाने अखिल वारकरी संघ पदग्रहण सोहळ्यानिमित्त भव्य किर्तन व सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याचे औचित्य साधून श्री. शरद (लाला शेठ) जावळकर, मा. सरपंच, खानापूर तथा कार्याध्यक्ष, अखिल वारकरी संघ, पुणे जिल्हा यांच्या नेतृत्वाखाली हा भक्तिमय कार्यक्रम संपन्न होणार आहे.

हा सोहळा शुक्रवार, दि. १६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० ते १२

स्थळ : श्रीजीत लॉन्स, मंगल कार्यालय, आगळंवे फाटा येथे पार पडणार आहे. कार्यक्रमात सुप्रसिद्ध किर्तनकार ह.भ.प. उमेश महाराज दशरथे (आळंदी) यांची प्रभावी किर्तनसेवा लाभणार असून, वारकरी संप्रदायातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

या प्रसंगी ह.भ.प. सच्छिद्र व कुंभार, राष्ट्रीय अध्यक्ष, अखिल वारकरी संघ, महाराष्ट्र राज्य यांच्या प्रमुख उपस्थितीत पदग्रहण व सत्कार समारंभ होणार आहे. तसेच ह.भ.प. सुनिल स. मते (अध्यक्ष, पुणे जिल्हा), गोविंद स. गोरे (राष्ट्रीय उपाध्यक्ष), संजय हिवराळे (राष्ट्रीय सचिव) यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

# आता इतिहास घडवा : एकनाथ शिंदे

## 'सहकारनगर - पद्मावती'मध्ये भगवेमय वातावरण : मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद






**पुणे (दै. आरंभ पर्व)**
ज्यांच्या पाठीशी लाडक्या बहिणी त्यांना चिंता नाही.विधानसभा निवडणुकीत हे आपण पाहिले आहे. आता महापालिका निवडणुकीत पुन्हा दाखवून द्या, इतिहास कसा घडतो असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी येथे केले.

प्रभाग क्रमांक ३६ सहकारनगर - पद्मावतीमधील शिवसेना पक्षाचे अधिकृत उमेदवार आबा बागुल यांच्यासह बाळासाहेब उर्फ मच्छिन्द्र ढवळे, पूनम हरीश परदेशी, नयना नितीन लगस या शिवसेनेच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ पक्षाचे मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रचार रॅलीतून नागरिकांना अभिवादन करून मतदारांशी संवाद साधला. 'सहकारनगर - पद्मावती'मध्ये काढलेल्या प्रचार रॅलीला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विशेष म्हणजे यावेळी 'लाडक्या बहिणी राहणार एकनाथ शिंदे यांच्या उमेदवारांच्या पाठीशी' या महिलांच्या घोषणा लक्षवेधी ठरल्या आणि उपस्थितांसह खुद्द उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही दाद दिली.

यावेळी एकनाथ शिंदे म्हणाले की, प्रभाग ३६ मध्ये विविध विकास प्रकल्पाच्या माध्यमातून आबा बागुल यांनी नागरिकांच्या मनात अढळ स्थान निर्माण केले आहे.प्रभागातील पायाभूत सुविधा, नागरी समस्या आणि पुनर्विकास आदी सर्व कामां साठी आबा बागुल यांना नगरविकास विभागाच्या माध्यमातून भरघोस निधी देऊ अशी ग्वाही त्यांनी दिली, मात्र त्यासाठी आबांना सातव्यांदा महापालिकेत पाठवून इतिहास घडविण्याची आणि या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्याची संधी सोडू नका असे आवाहनही शिंदे यांनी मतदारांना केले.

तत्पूर्वी क्रांतिसूर्य महात्मा फुले चौकातील सभेत उद्योग मंत्री उदय सामंत यांनी हजारोंच्या संख्येने महिलांची उपस्थिती आणि युवकांचा सहभाग पाहता आता परिवर्तन अटळ असल्याचे स्पष्ट केले. आबा बागुल यांचा प्रभाग पाहायला लोकं बाहेरून येतात,त्यामुळे पुण्यातील प्रत्येक प्रभाग आबा बागुल यांच्या प्रभागासारखे झालेच पाहिजे. पुण्याचे वाहतूक, पाणी, आरोग्य असे कोणतेही प्रश्न असो शिवसेना सर्व प्रश्न मार्गी लावण्यासाठी कटिबद्ध आहे आणि पुण्याच्या विकासाला गती देण्यासाठी आबा बागुल हे सज्ज आहेत. झोपडपट्टीवासियांना हक्काची घरे देण्याबाबत नगरविकास खाते असणारे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेच दिलासा देतील. ५०० चौ. फूट घरांचा मिळकतकर माफ करण्याची घोषणाही उदय सामंत यांनी केली. तसेच उद्योगभवन पुण्यात उभारण्यासाठी सर्वतोपरी मदत केली जाईल. आबा बागुल यांची ताकद आणखी वाढविण्यासाठी आम्ही सर्वजण निश्चितच त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणारच असेही ते म्हणाले.

आबा बागुल म्हणाले, येत्या १५ तारखेला मतदान करताना फक्त धनुष्यबाण या चिन्हासमोरील बटन दाबायचे आहे. शिवसेना म्हणजे सर्वांगीण विकास हेच लक्षात ठेवायचे आहे.

यावेळी आबा बागुल यांनी विकास आराखड्यात आरक्षित असलेल्या प्रभागातील जागांवर विविध प्रकल्पाबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मागणीचे निवेदन सादर केले.त्यावर एकनाथ शिंदे म्हणाले,नागरिकांच्या आरोग्य सेवेसाठी तातडीची गरज म्हणून तळजाई टेकडी येथे ३०० बेडचे मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल उभारणीस मान्यता दिली जाईल. दर्जेदार व आधुनिक शिक्षण सुविधा वाढविण्यासाठी तळजाई टेकडी येथे राजीव गांधी ई-लर्निंग स्कूलच्या धर्तीवर नवीन शाळा उभारणीला प्राधान्य दिले जाईल.

**आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षण सुलभ व्हावे यासाठी वाळवेकर नगर येथे अत्याधुनिक इंजिनिअरिंग कॉलेज (मोफत / सवलतीत शिक्षण) सुरू करण्याबाबत सकारात्मक निर्णय घेतला जाईल. प्रभाग व शहर झोपडपट्टीमुक्त करण्याच्या दृष्टीने झोपडपट्टीधारकांना स्वयंपुनर्विकासातून हक्काची घरे मिळण्यास परवानगी व शाहू वसाहतीच्या एसआरए प्रकल्पाला दिलेली स्थगिती कायम ठेवून तेथील रहिवाशांना स्वयंपुनर्विकासाची मुभा देण्याबाबत कार्यवाही होईल असे आश्वासन देताना ज्या ज्या मागण्या केल्या आहेत त्या नगरविकास विभागामार्फत निश्चित मार्गी लावल्या जातील अशी ग्वाही त्यांनी दिली. पुणे शहरातील वाढती वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी एचसीएमटीआर (रिंग रोड) प्रकल्पाला तातडीने गती देण्याबाबतही निर्णय होईल असेही त्यांनी स्पष्ट केले.**




दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
शनिवार, दि. १० जानेवारी २०२६









## प्रभाग ३४मध्ये भाजपच्या पदयात्रेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2026 च्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक ३४ मध्ये भारतीय जनता पार्टीच्या अधिकृत उमेदवारांच्या प्रचारार्थ वडगाव बुद्रुक परिसरात भव्य पदयात्रा आयोजित करण्यात आली होती. या पदयात्रेमुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. या पदयात्रेत प्रभाग क्रमांक ३४ मधील भाजपाचे अधिकृत उमेदवार हरिदास कृष्णा चरवड, कोमल सारंग नवले, जयश्री सत्यवान भुमकर आणि राजाभाऊ मुरलीधर लायगुडे सहभागी झाले होते.



पदयात्रेची सुरुवात धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यानंतर ही पदयात्रा वडगाव बुद्रुक परिसरातील विविध वस्ती, गल्ल्या आणि चौकातून मार्गक्रमण करत पुढे गेली. उमेदवारांनी घराघरांत जाऊन नागरिकांशी थेट संवाद साधत त्यांच्या समस्या, अपेक्षा आणि सूचना जाणून घेतल्या. महिलांनी औक्षण करून उमेदवारांचे स्वागत केले, तर नागरिकांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद आणि कार्यकर्त्यांचा जोश या पदयात्रेचे विशेष आकर्षण ठरले.

यावेळी नागरिकांनी रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य सेवा आणि मूलभूत सुविधांबाबत प्रश्न उपस्थित केले. त्यावर उमेदवारांनी सर्वांगीण विकास, पारदर्शक कारभार आणि लोकाभिमुख प्रशासन देण्याची ग्वाही दिली.

या पदयात्रेला भाजपाचे स्थानिक नेते, पदाधिकारी, मित्र पक्षांचे कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. येणाऱ्या महापालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक ३४ मधून भाजपाच्या उमेदवारांना मोठे यश मिळेल, असा विश्वास यावेळी कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. यावेळी बोलताना माजी नगरसेवक हरिदास चरवड यांनी या परिसरातील उर्वरित सर्व समस्या सोडवण्यासाठी व विकासासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. याशिवाय सर्व उमेदवार विजयी होतील असा विश्वास व्यक्त केला.

## खुनाआधी ‘शेवटची इच्छा’ विचारून अमानुष हत्या

**सिंहगड (दै. आरंभ पर्व)**

खेड शिवापूर परिसरातील वर्तुमुख मंदिराच्या डोंगरात घडलेल्या एका थरकाप उडवणाऱ्या हत्येचा तपास पोलिसांनी उलगडला आहे. प्रथमेश आढळ आणि त्याच्या साथीदारांनी अमनसिंग गचंड (वय १७, रा. टिंगरेनगर, विश्रांतवाडी) याची अतिशय निघृण पद्धतीने हत्या केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. खुनाआधी आरोपींनी अमनसिंगकडे‘शेवटची इच्छा’ विचारली; त्याने सिगारेट व बीअरची मागणी केल्यानंतर त्याला स्वतःचा खड्डा खोदायला लावून, गळा चिरत डोके दगडाने ठेचल्याचा धक्कादायक



प्रकार उघडकीस आला आहे.

ही घटना २९ डिसेंबर रोजी घडली. तब्बल नऊ दिवसांनंतर बुधवारी (दि. ७) सायंकाळी पोलिसांनी खेड शिवापूरच्या डोंगरातील पुरलेल्या खड्ड्यातून मृतदेह बाहेर काढला. मृतदेहाची अवस्था अत्यंत बिकट झाल्याने त्याच ठिकाणी शवविच्छेदन करण्यात आले, अशी माहिती पोलिस उपायुक्त सी. एच. रजनीकांत यांनी दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सप्टेंबर २०२५ मध्ये अमनसिंग आणि प्रथमेश आढळ यांच्यात वाद झाला होता. त्या वादात झालेल्या मारहाणीत प्रथमेशच्या हाताला गंभीर दुखापत झाली होती. त्याचा राग मनात धरून प्रथमेशने सूड उगवण्याचा कट रचला.

## कृष्णाई वॉटर पार्क सहल; उस्फूर्त प्रतिसाद

**डोणजे(दै. आरंभ पर्व)**

सिंहगड पायथा येथील कृष्णाई वॉटर पार्क येथे नवनाथ दादा पारगे मित्र मंडळाच्या वतीने आयोजित या सहलीसाठी लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्व वयोगटातील नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. कुटुंबासह आनंद, विरंगुळा आणि सुरक्षित मनोरंजनाचा अनुभव मिळाल्याने नागरिकांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद स्पष्ट दिसून आला.

सहलीचे काटेकोर नियोजन, सुरक्षित वाहतूक व्यवस्था, शिस्तबद्ध व्यवस्थापन यामुळे सामान्य नागरिकांनी आयोजकांबद्दल मनापासून समाधान व्यक्त केले. “ही केवळ सहल नाही, तर आमच्यासारख्या सामान्य माणसाच्या आनंदाचा विचार करणाऱ्या नेतृत्वाची ओळख आहे,” अशी भावना अनेक नागरिकांनी व्यक्त केली.

यावेळी बोलताना मा. सभापती पुजाताई नवनाथ पारगे म्हणाल्या, “सलग दहा वर्षे जनतेने दिलेल्या प्रेम, विश्वास आणि आशीर्वादाच्या बळावरच विकासाची घोडदौड सुरू आहे. होय, आम्ही सज्ज आहोत — जनआशीर्वादाने हॅट्रिकसाठी. तुमचा प्रेमरूपी आशीर्वाद असाच कायम राहो.”

## प्रभाग क्रमांक ३३ मध्ये भाजपची भव्य पदयात्रा व बाईक रॅली

### जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद, विकासाच्या मुद्द्यांवर थेट संवाद



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक ३३ – शिवणे | खडकवासला | धायरी (पार्ट) येथे भारतीय जनता पार्टीच्या अधिकृत उमेदवारांच्या प्रचारार्थ दिनांक ७ जानेवारी २०२६ रोजी किरकटवाडी, नांदोशी व सणसवाडी परिसरात भव्य व उत्साहपूर्ण पदयात्रा तसेच बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले.

या पदयात्रेत प्रभाग ३३ (ड) चे अधिकृत उमेदवार सौ. धनश्री दत्तात्रय कोल्हे, सौ. ममता सचिन दांगट, श्री. सुभाष मुरलीधर नाणेकर व श्री. किशोर दत्तात्रय पोकळे यांच्या नेतृत्वाखाली नागरिकांशी थेट संवाद साधण्यात आला. घराघरांत भेटी देत स्थानिक प्रश्न, विकासकामे, नागरी सुविधा, सुरक्षितता व भविष्यातील नियोजनाबाबत नागरिकांचे मत जाणून घेण्यात आले. पदयात्रेदरम्यान भारतीय जनता पार्टीच्या विकासात्मक कार्याची माहिती देत सक्षम व स्थिर नेतृत्वासाठी भाजपला मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले. या वेळी परिसरातील नागरिक, महिला, युवक तसेच पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

ठिकठिकाणी नागरिकांनी उमेदवारांचे स्वागत करत आपला पाठिंबा व्यक्त केला. या कार्यक्रमास भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांची लक्षणीय उपस्थिती लाभली.

पदयात्रा व बाईक रॅलीला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद हा भाजपच्या विकासाच्या धोरणावर जनतेचा असलेला विश्वास दर्शवणारा असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. आगामी महापालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक ३३ मध्ये भाजपाला भक्कम पाठिंबा मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

### प्रभाग क्रमांक ३३ मधील समाविष्ट गावांसाठी

# भाजपने केलं तरी काय?

### काकासाहेब चव्हाण यांचा सवाल : मतदारांमध्ये तुतारीला पसंती; सर्व उमेदवार विजयी होतील

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

प्रभाग क्रमांक 33 विकासासाठी भाजपा नेते विकासाचे राजकारण करू असे सांगत असतात. मात्र त्यांनी व त्यांच्या आमदारांनी या प्रभागात काय केले असा उपरोधिक टोला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते, उमेदवार काकासाहेब चव्हाण यांनी लगावला.

निवडणुकीच्या अनुषंगाने पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी विविध विषयावर संवाद साधला..

प्रभाग क्रमांक ३३ खडकवासला शिवणे धायरी पार्ट असलेल्या ह्या प्रभागात असंख्य समस्या उभ्या राहिल्या आहेत..पाणीपुरवठा, ड्रेनेज लाईन ,रस्ते यासारखे बहुतेक सुविधांची ही वानवा आहे. यामुळे या परिसरातील मतदार भाजपवर प्रचंड त्रासलेला आहे. त्यामुळे या भागांमध्ये परिवर्तनाचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने



मतदारांशी समोर असताना मतदार उस्फूर्त प्रतिसाद देत आहेत. त्यामुळे मतदारांमध्ये असलेला कमालीचा उत्साह या निवडणुकीचा निकाल सांगत आहे. असेही त्यांनी सांगितले..

समाविष्ट गावासाठी असलेला वाढीव टॅक्स कर रद्द केल्याचे भाजप नेते सांगत असतात. मात्र कोणताही कर त्यांना रद्द करता आला नाही.. विधानसभेमध्ये आमदार तापकिरांनी विषय मांडूनही त्यावर निर्णय झाला नाही.

त्यामुळे भाजपचे नियोजन शून्य कर्तव्याला कंटाळून या भागातील मतदारांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला पसंती दिली आहे...असे त्यांनी सांगितले..

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाकडून प्रभाग क्रमांक 33 मध्ये काकासाहेब चव्हाण, संदीप मते, अनिता इंगळे, रश्मी घुले असे चौघेजन रिंगणात उतरणार आहेत..

राष्ट्रवादीचे काँग्रेसच्या या मजबूत पॅनल पुढे भाजपाची खरी कसोटी लागणार आहे.

विधानसभा उमेदवारीसाठी काकासाहेब चव्हाण प्रयत्नशील होते मात्र पक्षाने दोडकेना संधी दिली. प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी विधानसभेला संधी दिली नाही याची खंत व्यक्त केली..

त्या प्रश्नावर काकासाहेब चव्हाण यांनी बोलताना झाले ते गेले .

पक्षाने परिस्थिती पूर्वक निर्णय घेतला तो आपण मान्य केला. पवार साहेबांच्या दूरदृष्टीचे नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पुढे येण्यासाठी प्रयत्न केला.

पदे येतील जातील परंतु सर्वसामान्य जनतेच्या मनात आपलं स्थान बळकट करण्यासाठी आपण निष्ठा त्याग संयम समर्पण जिद्द ठेवली पाहिजे. तरच जनतेच्या मनामध्ये आपल्याला जागा मिळते . त्यासाठी थोडं समर्पण करायला काय हरकत आहे. असे बोलत त्यांनी त्यांच्यातील वक्तशीर पणाला दाखवून दिला.

प्रभागातील चारही उमेदवार विजयी होतील असा विश्वास यावेळी काकासाहेब चव्हाण यांनी व्यक्त केला.

## ग्रामपंचायत गोपाळवाडी, ता. दौंड, जि. पुणे

**B1 पेपर नोटीस क्रमांक 1 सन 2026-2027**

**निविदा सूचना क्र. १/२५-२६**

ग्रामपंचायत गोपाळवाडी, ता. दौंड, जि. पुणे यांचेकडून खालील नमूद केलेल्या कामांची निविदा बी 1 निविदा पद्धतीने (दोन) सिलबंद लिफाफा पद्धतीने) जिल्हा परिषद कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागविण्यात येत आहेत. कोऱ्या निविदेचा नमुना ग्रामपंचायत गोपाळवाडी, ता. दौड, जि. पुणे यांच्याकडून दिनांक 010/01/2026 ते दिनांक 16/01/2026 या कालावधीत कामकाजाच्या दिवशी सकाळी 10 ते सायंकाळी 06 वाजेपर्यंत देण्यात येतील व दिनांक 10/01/2026 ते दिनांक 16/01/2026 रोजी सकाळी 10 ते सायंकाळी 06 वाजेपर्यंत पोस्टाने / समक्ष ग्रामपंचायत मध्ये स्विकारले जातील. सदर सिलबंद निविदा ग्रामपंचायत मासिक सभा 17/01/2065 रोजी उघडण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा विक्री करण्याचा कालावधी | निविदा फी | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | बनकर मळा उर्वरित भूमिगत गटर लाईन करणे | 300000/- | १०/०१/२०२६ ते १६/०१/२०२६ | 100/- | सूट सु.बे.अ. |
| २ | भागवत वस्ती बंदिस्त गटर लाईन करणे | 200000/- | १०/०१/२०२६ ते १६/०१/२०२६ | 100/- | सूट सु.बे.अ. |
| ३ | महादू गिरमे ते सुरेश गिरमे बंदिस्त गटलाइन करणे | 100000/- | १०/०१/२०२६ ते १६/०१/२०२६ | 100/- | सूट सु.बे.अ. |
| ४ | कुरकुम रोड ते कॅनॉलचारी रस्ता करणे | 200000/- | १०/०१/२०२६ ते १६/०१/२०२६ | 100/- | सूट सु.बे.अ. |
| ५ | नरके घर ते भगत घर रस्ता करणे | 200000/- | १०/०१/२०२६ ते १६/०१/२०२६ | 100/- | सूट सु.बे.अ. |
| ६ | बनकर मळा ते सुभाष होले रस्ता काँक्रिटीकरण करणे | 100000/- | १०/०१/२०२६ ते १६/०१/२०२६ | 100/- | सूट सु.बे.अ. |
| ७ | गोपाळवाडी रोड ते महादू होले रस्ता काँक्रिटीकरण करणे | 100000/- | १०/०१/२०२६ ते १६/०१/२०२६ | 100/- | सूट सु.बे.अ. |
| ८ | चोरमले वस्ती शाळा सुधारणा करणे | 200000/- | १०/०१/२०२६ ते १६/०१/२०२६ | 100/- | सूट सु.बे.अ. |
| ९ | गोपाळवाडी ग्रामपंचायत कार्यालय सुधारणा व आवश्यक साहित्य घेणे | 201524/- | १०/०१/२०२६ ते १६/०१/२०२६ | 100/- | सूट सु.बे.अ. |
| १० | प्रल्हाद लोखंडे घर ते प्रकाश काळे बंदिस्त गटर करणे | 100000/- | १०/०१/२०२६ ते १६/०१/२०२६ | 100/- | सूट सु.बे.अ. |

निविदेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे : 1) कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारणे चा अधिकार ग्रामपंचायत ने राखून ठेवला आहे. 2) कोऱ्या निविदा फी ग्रामपंचायत गोपाळवाडी PDCC बँक दौंड शाखा क्रमांक 003002500000052 वर किंवा ग्रामपंचायत कार्यालयात रोख भरल्यानंतर उपलब्ध होतील. तसेच निविदा भरणे कमी आवश्यक अटी व शर्ती सोबत दिल्या जातील. 3) यापूर्वी केलेल्या कामांचे पूर्णत्वाचे दाखले जोडावेत. 4) इसारा रक्कम ग्रामपंचायत गोपाळवाडी ग्रामनिधी खाते PDCC बँक दौंड शाखा क्रमांक 003002500000052 च्या खाती भरल्याची पावती जोडण्यात यावी किंवा ग्रामपंचायत नावे धनादेश DD जोडण्यात यावा. तसे न केल्यास आपल्या निविदेचा विचार केला जाणार नाही. 5) सदरील काम भरण्यापूर्वी कामाचे स्थळ पाहणी करून ग्रामपंचायत गोपाळवाडी यांचा स्थळ पाहणी दाखला सोबत जोडावा. 6) आपण तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा वेग वेगळे सादर करणे आवश्यक आहे. तांत्रिक लिफाफा प्रथम उघडण्यात येईल आपण सर्व नियमास पात्र झाल्यानंतर आर्थिक लिफाफा उघडण्यात येईल. सदर निविदा बाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास निविदा रद्द करण्याचा किंवा कोणतीही निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारणेचा सर्व अधिकार ग्रामपंचायत गोपाळवाडी यांनी राखून ठेवला आहे.

ग्रामसेवक सरपंच
ग्रामपंचायत गोपाळवाडी ता. दौंड, जि. पुणे

## थोडक्यात पण महत्वाचे




### बहिणीसाठी लाडका भाऊ मैदानात; संघर्षातून घडलेली साथ ठरतेय ताकद

पुणे (आरंभ पर्व) : हरीश वैद्य हे आपल्या बहिणीसाठी केवळ भावनिक नात्यानेच नव्हे, तर संघर्षातून आलेल्या अनुभवाच्या बळावर निवडणुकीच्या मैदानात उतरले आहेत. त्यांची बहीण नेहा भूपेंद्र मोरे या प्रभाग क्रमांक 34 ब मधून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून निवडणूक लढवत असून, त्यांच्या प्रचाराची संपूर्ण जबाबदारी हरीश वैद्य खांद्यावर घेताना दिसत आहेत. हरीश वैद्य यांनी यापूर्वी आपले दाजी, सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांच्या सर्व आंदोलनांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवला आहे. आमरण उपोषण असो, विविध आंदोलने, मोर्चे असोत किंवा प्रशासनाच्या संपूर्ण यंत्रणेला हालचाल करायला लावणारे संघर्ष—प्रत्येक टप्प्यावर हरीश वैद्य ठामपणे उभे राहिले आहेत. त्यामुळेच ते केवळ प्रचारक नव्हे, तर संघर्षातून घडलेले कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. आज त्याच अनुभवाच्या जोरावर ते आपल्या बहिणीला नगरसेविका करण्यासाठी सकाळपासून रात्रीपर्यंत अथक परिश्रम घेत आहेत. घराघरांत जाऊन मतदारांशी संवाद, स्थानिक प्रश्नांची माहिती, कार्यकर्त्यांचे संघटन आणि प्रचाराचे नियोजन या सर्व आघाड्यांवर ते सक्रिय आहेत. संघर्षमय परिस्थितीतून घडलेला माणूस पुढे जात असतो, याचीच प्रचिती या निवडणुकीच्या निमित्ताने दिसून येत आहे. भावंडांची ही एकजूट आणि सामाजिक लढ्याचा वारसा यामुळे प्रभाग क्रमांक 34 ब मध्ये नेहा भूपेंद्र मोरे यांच्या प्रचाराला बळ मिळत असून, परिसरात त्यांच्या विजयाबाबत सकारात्मक चर्चा रंगू लागली आहे.

### ब्रेक्स इंडियाच्या रेव्हिया'चे उच्च-कार्यक्षमतेचे क्लचेस केले सादर

पुणे (आरंभ पर्व) : ब्रेक्स इंडियाने रेव्हिया' क्लचेस सादर करून आपल्या मोबिलिटी सोल्यूशन्स पोर्टफोलिओचा शानदार विस्तार केला आहे. भारतातील विविध ड्रायव्हिंग परिस्थितीत व्यावसायिक वाहने, ट्रक आणि बसेसच्या कामगिरीच्या बिकट गरजा पूर्ण करण्यासाठी या क्लचेसची रचना करण्यात आली आहे. उंची फ्रिक्शन मटेरियल्स आणि रिनफोर्स्ड स्प्रिंग तंत्रज्ञानाचा वापर करून विकसित केलेल्या रेव्हिया' क्लचेसमध्ये दमदार टिकाऊपणा, श्रेष्ठ उष्णता शोषण (हीट डिसिपेशन) आणि सातत्यपूर्ण पॉवर ट्रान्समिशन मिळते. जड वजन, तीव्र चढउतार, दाट शहरातील रहदारी आणि लांब पल्ल्याच्या ऑपरेशन्समध्येसुद्धा हा लाभ मिळतो. कमी झीज आणि दीर्घ सेवा आयुष्यासाठी त्यांची रचना करण्यात आली असून या क्लचमुळे फ्लीट ऑपरेटर्सना डाउनटाइम कमी करण्यास, देखभाल खर्च कमी करण्यास आणि वाहन अपटाइम जास्तीत जास्त करण्यास मदत होते.







# खडकवासल्याचा सुपुत्र नगरसेवक होणार

## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाची प्रचार पदयात्रा उत्साहात





**पुणे (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला गावामध्ये पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ भव्य पदयात्रा काढण्यात आली. या पदयात्रेत संदीप मते, काकासाहेब चव्हाण, अनिता इंगळे आणि रश्मी घुले या उमेदवारांच्या समर्थनार्थ नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

या पदयात्रेतील उमेदवार संदीप मते हे खडकवासला गावचे सुपुत्र असून, त्यांना नगरसेवक करण्यासाठी गावातील नागरिकांसह परिसरातील महिला भगिनींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. "भाजी विक्रेत्यापासून सुरू झालेला संघर्ष नगरसेवक पदापर्यंत पोहोचावा," अशी भावना गावकऱ्यांनी यावेळी व्यक्त केली.

पदयात्रेदरम्यान घराघरांतून स्वागत, घोषणाबाजी आणि जनसंवाद यामुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

स्थानिक प्रश्न, विकासकामे आणि जनतेशी असलेला थेट संपर्क यामुळे उमेदवारांना मोठा पाठिंबा मिळत असल्याचे चित्र दिसून आले.

यावेळी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पक्षाचे नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पदयात्रेच्या शेवटी उमेदवार संदीप मते यांनी उपस्थित नागरिकांचे व कार्यकर्त्यांचे मनःपूर्वक आभार मानत, जनतेच्या विश्वासाला पात्र ठरण्यासाठी प्रामाणिकपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. यावेळी उपस्थित महिला भगिनींनी व नागरिकांनी त्यांना खडकवासल्याचा श्रावण बाळ संदीपभाऊ मते म्हणत घोषणा देत नगरसेवक करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

त्यामुळे आगामी महानगरपालिका निवडणुकीसाठी संदीप मते प्रभावी उमेदवार असल्याची चर्चा सर्वत्र होत आहे.

## ॲन्युइटी : निवृत्ती नियोजनासाठीचा एक भक्कम पाया

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आर्थिकदृष्ट्या सुरक्षित निवृत्त जीवन हे आयुष्यभर टिकणाऱ्या स्थिर उत्पन्नाच्या पायावर मजबूत उभे असते. त्यामुळे, निवृत्तीनंतर आर्थिक स्वातंत्र्य राखण्यासाठी ॲन्युइटी हा पाया ठरला आहे. वाढते आयुर्मान, वाढती महागाई आणि बाजारातील अस्थैर्य अशा घटकांमुळे अंदाजित उत्पन्नाची गरज पूर्वीपेक्षा जास्त महत्त्वाची बनली आहे. आजचे निवृत्ती नियोजन फक्त बचतीपुरते मर्यादित नाही.

त्यासाठी एक विश्वासार्ह उत्पन्न प्रवाह तयार करणे आवश्यक आहे जो निवृत्तीनंतरच्या दीर्घ वर्षांमध्ये एक चांगले राहणीमान देऊ शकेल. ॲक्सिस मॅक्स लाईफ इन्शुरन्सने कंटारच्या भागीदारीत केलेल्या इंडिया रिटायरमेंट इंडेक्स स्टडी ५.० (आयआरआयएस ५.०) मध्ये अंदाज वर्तवण्यात आला आहे की पुढील ५-१० वर्षांत सुमारे १२० दशलक्ष भारतीय लोक निवृत्त होतील.

यातून स्थिर, खात्रीशीर उत्पन्न उपायांसाठी वाढत्या मागणीच्या आगामी ट्रेंडचे संकेत मिळतात. अनुराग गुप्ता, ईव्हीपी आणि मुख्य व्यवसाय अधिकारी भागीदारी चॅनल, ॲक्सिस मॅक्स लाइफ इन्शुरन्स म्हणाले की, आयआरआयएस ५.० च्या अभ्यासानुसार देशाच्या निवृत्ती तयारी निर्देशांकात लक्षणीय वाढ झाली आहे.

# पक्षाने ऐनवेळी डावलले याची खंत

## ...पण मिळालेल्या संधीचे सोने करणार" – बापूसाहेब पोकळे पाटील

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक ३४ मध्ये राजकीय वातावरण तापले असून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे उमेदवार बापूसाहेब पोकळे पाटील यांनी आपली भूमिका मांडली. गेली अनेक वर्षे भारतीय जनता पार्टीसाठी प्रामाणिकपणे काम केल्यानंतरही ऐनवेळी उमेदवारी नाकारण्यात आल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. यावेळी पक्षाकडून संधी मिळेल, असा विश्वास होता; मात्र वरिष्ठ नेतृत्वाकडून अपेक्षाभंग झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

निवडणूक लढवायचीच असा निर्धार असल्याने कार्यकर्त्यांनी विविध पर्याय सुचवले. अशा परिस्थितीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिलेल्या संधीचे आपण सोने करणार असल्याचे पोकळे पाटील यांनी सांगितले. राष्ट्रवादी काँग्रेसने आपल्यावर विश्वास टाकून न्याय दिला, त्याबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले.




चर्चेदरम्यान त्यांनी प्रभागातील मूलभूत समस्यांकडे लक्ष वेधले. "या भागात अनेक सोयी-सुविधांचा अभाव आहे. रस्ते, पाणी, ड्रेनेज, आरोग्य व नागरी सुविधा यासाठी प्राधान्याने काम करणार असून प्रभागाचा सर्वांगीण विकास हाच माझा संकल्प आहे," असे ते म्हणाले. अन्याय भारतीय जनता पार्टीमध्ये झाला असला, तरी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने न्याय दिल्याने जनतेच्या विश्वासाला पात्र ठरणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या नव्या व युवा नेतृत्वामुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला असून मतदारांकडूनही परिवर्तनाचे स्पष्ट संकेत मिळत असल्याचे पोकळे पाटील यांनी नमूद केले. बापूसाहेब पोकळे, नेहा व भूपेंद्र मोरे, तृप्ती प्रतीक पोकळे आणि शरद दबडे या नव्या चेहऱ्यांमुळे प्रस्थापित उमेदवारांसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये बापूसाहेब पोकळे यांच्या एन्ट्रीमुळे प्रभागातील चुरस वाढली असून १६ तारखेला पक्षाचे चारही उमेदवार विजयी होतील, असा ठाम विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

# २३ जानेवारीपासून आठवी विश्वनाथ स्पोर्ट मिट

- एमआयटी एडीटी विद्यापीठात रंगणार राष्ट्रीय आंतरविद्यापीठीय स्पर्धेचा थरार
- ऑलिंपियन मुष्ठीयोद्धा विजेंदर सिंह यांच्या उपस्थितीत स्पर्धेचे भव्य उद्घाटन




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठ, विश्वराजबाग, पुणे येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही आठवी विश्वनाथ स्पोर्ट मिट (व्हीएसएम–२०२६) या वर्षातील सर्वांत मोठ्या राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन/आंतरविद्यापीठीय क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचा आठवा हंगाम २३ ते २८ जानेवारी २०२६ दरम्यान विद्यापीठाच्या क्रीडा संकुलात पार पडणार आहे.

स्पर्धेचे उद्घाटन शुक्रवार, दि. २३ जानेवारी २०२६ रोजी पद्मश्री, अर्जुन पुरस्कार व ऑलिंपिक कांस्यपदक विजेते मुष्ठीयोद्धा विजेंदर सिंह यांच्या हस्ते होणार आहे. हा कार्यक्रम एमआयटी शिक्षण समूहाचे संस्थापक विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार असून, भारतीय क्रीडा प्राधिकरण (साई) नेताजी सुभाष राष्ट्रीय क्रीडा संस्थेचे (एनएसएनआयएस) उपमहासंचालक व वरिष्ठ कार्यकारी संचालक विनित कुमार, मेजर ध्यानचंद पुरस्कारप्राप्त बॅडमिंटनपटू तृप्ती मुरगुंडे, विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष प्रा. डॉ. मंगेश कराड तसेच डॉ. सुनीता कराड यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

स्पर्धेचा समारोप व बक्षीस वितरण समारंभ बुधवार, दि. २८ जानेवारी २०२६ रोजी विद्यापीठाच्या क्रीडा संकुलात होणार आहे. या समारंभात पद्मश्री व अर्जुन पुरस्कारप्राप्त तसेच रोईंगमध्ये आशियाई सुवर्णपदक विजेते कॅप्टन बजरंग लाल ताखर (व्हीएसएम) यांच्या हस्ते बक्षीस वितरण होणार असून, ऑलिंपियन व अर्जुन पुरस्कार विजेते जलतरणपटू विरधवल खाडे तसेच मेजर ध्यानचंद पुरस्कारप्राप्त रोवर स्मिता शिरोळे-यादव यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांच्या प्रेरणेतून व प्रा. डॉ. मंगेश कराड यांच्या पुढाकाराने देशातील विद्यापीठांमधील विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा संस्कृती रुजावी तसेच विविध क्रीडाप्रकारांतून प्रतिभावान खेळाडू घडावेत, या उद्देशाने विश्वनाथ स्पोर्ट मिटची सुरुवात करण्यात आली. या स्पर्धेच्या माध्यमातून सक्षम क्रीडा व्यासपीठ उपलब्ध करून देत राज्यासह देशाच्या क्रीडा संस्कृतीत मोलाची भर घालणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

## सासवडमध्ये 'कोण होणार सभापती?' जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा

- १० जानेवारीला रंगणार बौद्धिक रणधुमाळी

**सासवड (दै. आरंभ पर्व)**

सासवड सांस्कृतिक मंडळ, सासवड आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर सेंटर ऑफ एक्सलन्स, सासवड यांच्या संयुक्त विद्यमाने, पुरंदर–हवेलीचे लोकप्रिय आमदार मा. श्री. संजयजी चंदुकाका जगताप यांच्या अभिष्टचिंतनानिमित्त वर्ष जिल्हास्तरीय भव्य वक्तृत्व स्पर्धा – 'कोण होणार सभापती?' या अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा शनिवार, दि. १० जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन, सासवड येथे पार पडणार आहे. स्पर्धेत जिल्ह्यातील तरुण, अभ्यासू व वक्तृत्वकौशल्य असलेले स्पर्धक सहभागी होणार असून, बौद्धिक स्पर्धेचे रंगतदार वातावरण निर्माण होणार आहे. स्पर्धेसाठी सभापती करंडक व सर्व ट्रॉफी सुप्रसिद्ध चित्रपट कला दिग्दर्शक संदीप तुकाराम इनामके यांच्या वतीने देण्यात येणार आहेत. तसेच प्रथम क्रमांकास ₹७,०००, द्वितीय ₹५,०००, तृतीय ₹३,००० व दोन उत्तेजनार्थ बक्षिसे देण्यात येणार आहेत.

वक्तृत्व स्पर्धा दोन फेऱ्यांमध्ये होणार असून, प्राथमिक फेरीसाठी वंदेमातरम्, राजकारणातील अर्थकारण, आधुनिक काळात किल्ल्यांचे महत्त्व, स्त्री–कुटुंब–संस्कार, हनीट्रॅप/ब्रह्मचर्य असे विषय देण्यात आले आहेत. पहिल्या फेरीतून टॉप १० स्पर्धकांची निवड केली जाणार आहे.

# सर्वेक्षणाच्या आधारे मनीषा शितोळे यांना संधी : आ. रोहित पवार

## प्रभाग क्रमांक ३०च्या विकासासाठी प्रयत्नशील : रोहित पवार





**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक 30 कर्वेनगर हिंगणे कॉलनी मध्ये जनतेच्या सविस्तर सर्वेक्षणाच्या आधारे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने सौ. मनीषा विरेश शितोळे यांना उमेदवारी दिली आहे. ही संधीचे निश्चितच सोने करतील, असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आ.रोहित पवार यांनी व्यक्त केला. राष्ट्रवादी काँग्रेसच्या अधिकृत उमेदवार सौ. मनीषा शितोळे यांच्या प्रचारार्थ कर्वेनगर परिसरात भव्य पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या पदयात्रेदरम्यान नागरिकांशी थेट संवाद साधत रोहित पवार यांनी मतदारांना संबोधित केले.

ते म्हणाले की, प्रभागातील अनेक विकासकामे अर्धवट अवस्थेत असून ती पूर्ण करण्यासाठी नव्या, सक्षम आणि जनतेच्या विश्वासास पात्र उमेदवाराची गरज आहे.

मनीषा शितोळे यांच्या रूपाने प्रभागाला एक सकारात्मक आणि कार्यक्षम नेतृत्व मिळणार असून, सर्व नागरिकांनी त्यांना संधी द्यावी, असे आवाहन त्यांनी केले. पुणे शहरामध्ये भाजपच्या मागील काळात झालेला बकाल आणि असमतोल विकास बदलण्यासाठी आता परिवर्तनाची आवश्यकता आहे. स्वच्छ, नियोजनबद्ध आणि नागरिकाभिमुख विकासासाठी पुणे शहराने राष्ट्रवादी काँग्रेसच्या पाठीशी ठामपणे उभे राहावे, असेही रोहित पवार यांनी स्पष्ट केले. या पदयात्रेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे शहर प्रभारी अध्यक्ष श्रीकांत पाटील, शहर महिला अध्यक्ष स्वाती पोकळे , तसेच पक्षाचे अनेक कार्यकर्ते व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.